# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशी—४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) चा कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

( विद्या विभाग )

एम. आय. डी. सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली —४४२६०५ (विद्या) फोन नंबर ७१३२. २३३२३

गोविग/विद्या/जाक्र/४२७/२०२२ दि ०३/०६/२०२२

प्रति,

मा. प्राचार्य/विभाग प्रमुख,
सर्व संलग्नित/संचालित महाविद्यालय व शैक्षणिक विभाग
तसेच मा. प्राचार्य, मॉडेल कॉलेज,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय:—शुल्क निश्चिती समितीपुढे शुल्काबाबतचे प्रस्ताव सादर करण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ च्या कलम १०१ (३) नुसार विद्यापीठाने शुल्क निश्चिती समिती गठीत केलेली आहे. सदर समितीची सभा संलग्नित महाविद्यालयातील प्राप्त प्रस्तावानुसार आयोजित करावयाची आहे. शैक्षणिक सत्र २०२२—२०२३ करीता विद्यापीठाने निश्चित करून दिलेल्या शुल्का व्यतिरिक्त वाढीव शुल्क आकारावयाचे असतील, अशा संलग्नित कोणत्याही महाविद्यालयास शुल्क निश्चिती समितीकडे प्रस्ताव सादर करता येईल, सदर प्रस्ताव दिनांक १३/०६/२०२२ पर्यन्त विद्यापीठाकडे सादर करावेत. सदर मुदतीत आपण आपले प्रस्ताव साक्षांकित दस्ताऐवजासह विद्या विभाग गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या ठिकाणी पाठवावेत, हि विनंती.

**प्रस्तावासोबत सादर करावयाचे दस्ताऐवज:—**

१) संबंधित अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी शासनाने परवानगी दिल्याचे पत्र, विद्यापीठाने संलग्निकरण दिल्याबाबतचे पत्र, संबधित अभ्यासक्रमासाठी निर्धारित प्रवेश क्षमता.

२) संबंधित अभ्यासक्रमासाठी नियुक्त करण्यात आलेल्या पुर्णकाळ मान्यताप्राप्त व CHB शिक्षकांची यादी व विद्यापीठाद्वारे मान्यता देण्यात आलेल्या पत्राची प्रत व त्यांना देण्यात येत असलेल्या वेतनासंबधीचा मासीक व वार्षीक तपशील.

३) संबधित अभ्यासक्रमासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अंशदानात्मक मान्यताप्राप्त शिक्षकांची यादी तसेच त्यांना देण्यात येत असलेल्या मानधनसंबधीचा मासिक व वार्षिक तपशील.

४) संबधित महाविद्यालयात इतर अभ्यासक्रम (अनुदानित/विनाअनुदानित) सुरू असल्यास याबाबतचा तपशिल आणि विभागात नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदनिहाय यादी व त्यांना देण्यात येत असलेल्या वेतनासंबंधी मासीक व वार्षिक तपशील.

५) संबंधित महाविद्यालयात ज्या अभ्यासक्रमाचे शुल्क निर्धारणासाठी प्रस्ताव पाठविलेले आहेत तेच अभ्यासक्रम सुरू असल्यास यासाठी नियुक्त केलेल्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदनिहाय यादी व त्यांच्या मासिक व वार्षिक वेतनासंबधिचा तपशिल.

६) आवर्ती व अनावर्ती खर्चासंबधी मागील तीन वर्षाचे खर्च व उत्पन्नाचे अंकेक्षित प्रमाणपत्र.

७) सदर अभ्यासक्रमासाठी नियुक्त करण्यात आलेल्या मान्यताप्राप्त पुर्णवेळ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नावाचा समावेश असलेल्या प्रमाणित बिंदुनामावलीची झेरॉक्स प्रत.

८) शुल्क निर्धारण प्रस्तावात मागणी केलेल्या शिक्षण व इतर शुल्काबाबत सविस्तर स्पष्टीकरणासह तपशिल.

(डॉ. हेमंत बारसागडे)
उपकुलसचिव (प्र)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर:—**

१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२) मा. प्र—कुलगुरू, महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३) मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) मा. संचालक,परीक्षा व मुल्यमापन मंडळ महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
५) मा. वित्त व लेखाधिकारी महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
६) मा. सर्व विभाग प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
७) पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
८) संगणक विभाग प्रमुख सदर पत्र विद्यापीठ संकेतस्थळावर प्रकाशित करावे.